NAME	**:**	**MISS. MINAKSHI BABURAO BONDGE**
MOBILE NO.	**:**	**9421691728, 7721007145**
EMAIL ID	**:**	**minakshilibrary@gmail.com**
CATEGORY	**:**	**OPEN**
RESEARCH SUPERVISOR	**:**	**DR. GHANSHAYAM N. PANCHAL**
MOBILE NO.	**:**	**9421381785**
EMAIL ID	**:**	**drpanchalgn@rediffmail.com**
SUBJECT	**:**	**LIBRARY AND INFORMATION SCIENCE**
RESEARCH TOPIC **(RRC, Dated 02-08-2019)**	**:**	“ महाराष्ट्रातील नॅक ‘अ,ब आणि क’ दर्जा प्राप्त महाविद्यालयातील ग्रंथालयीन साहित्याचे जतन व संवर्धन : तौलनिक अभ्यास ”

" महाराष्ट्रातील नॅक 'अ,ब आणि क' दर्जा प्राप्त महाविद्यालयातील ग्रंथालयीन साहित्याचे जतन व संवर्धन : तौलनिक अभ्यास "

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, आंतरविद्याशाखे अंतर्गत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करण्यात येणा—या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

मिनाक्षी बाबूराव बोंडगे

M.Sc., B. Ed.,M. Lib.,& I.Sc., SET,PGDEE

ग्रंथपाल

महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा ता. निलंगा जि. लातूर

मार्गदर्शक

डॉ. घ. ना. पांचाळ

ग्रंथपाल

माधवराव पाटील महाविद्यालय, पालम ता. पालम जि. परभणी

संशोधन केंद्र

माध्यमशास्त्र संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

२०१७-१८

अनुक्रमणिका

अ. क्र.	घटक	पृ. क्र.
१	सारांश	६
२	प्रस्तावना	६
३	संदर्भ पुनरावलोकन	७
४	हेतू आणि उद्दिष्टे	९
५	संशोधन पध्दती	१०
६	संशोधनाचे महत्व आणि समाजाभिमूखता	११
७	प्रस्तावित कार्याचे नियोजन	११
	संदर्भ ग्रंथसूची	१२

१ सारांश

कोणत्याही समाजात एका पिढीतून दुस—या पिढीकडे ज्ञान वहन होणे ही अत्यंत मोलाची बाब आहे. अशा प्रकारचे वहन हे मूद्रित आणि अमूद्रित माध्यमातूनच शक्य होते. शतकानूशतके विविध अनूभवांनी असे सिध्द झाले आहे की ग्रंथालयाद्वारेच असे वहन व्हावे जेणेकरून तत्कालीन समाजाचे हित व भविष्यासाठीचे ज्ञान भांडवल अबाधित ठेवता येईल.

सर्व स्तरावरिल ग्रंथालयात उपलब्ध असणा—या साहित्यातून असे लक्षात येते की माहिती व तंत्रज्ञानाचा आणि माहिती संसाधनांचा निव्वळ उगमच झालेला नव्हे तर त्याचा स्फोट झालेला आहे. या सर्व साहित्यांचे जतन व संवर्धन करणे हे सर्व ग्रंथालयासमोर मोठे आव्हान आहे या साहित्यांची बदलत्या काळानूसार सुव्यवस्थित व शास्त्रोक्त मांडणी करणे ही सर्व संबंधिताची फार मोठी जबाबदारी आहे.

समाजनिर्मिती आणि समाजबांधणीमध्ये आवश्यक असणाऱ्या या मूद्रित व अमूद्रित साहित्याचे जतन व संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. बदलत्या काळानूरूप ग्रंथालयीन साहित्याचे जतन व संरक्षण केले गेले तरच ग्रंथालयाची सजीवता टिकून राहिल. वाचनसाहित्य जतन करण्यासाठी शास्त्रीय पद्वत आवश्यक आहे ग्रंथालयातील क्षतिग्रस्त मुद्रित आणि अमुद्रित साहित्यांचा समृद्व व परिपुर्ण असा सांस्कृतिक ठेवा जतन करण्याचे महत्वाचे कार्य ग्रंथालय व्यवस्थापन करते.

२ प्रस्तावना

मानवाने आपल्या कल्पना लिहण्यासाठी आणि संवाद साधण्यासाठी विविध प्रकारचे साहित्य वापरले आहे. प्राचीन काळात धातू व मिश्रधातू, दगड, लाकूड, चर्मपत्रे, झाडाची साल, आणि शिलालेख यांचा वापर केला जात होता. ग्रंथालयाचे मूख्य उद्दिष्ट माहिती गोळा करणे, संघटित करणे, तिचे जतन करणे आणि ती वितरित करणे आहे. हा उद्देश पूर्ण करण्यासाठी, भविष्यातील पिढीसाठी संस्कृतीचा हा मौल्यवान ठेवा जतन केला जातो.

ग्रंथसंग्रह भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ यांना सांधणारा दुवा आहे. हा सग्रंह मूद्रित किंवा अमूद्रित स्वरूपात असू शकतो असे असले तरी ग्रंथालयात आज मूद्रित स्वरूपातील साहित्य मोठया प्रमाणात आहे. प्रत्येक ग्रंथालयांनी सांस्कृतिक ठेवा जतन करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलावित आणि दूर्मिळ ग्रंथ, हस्तलिखिते, प्रतिमा इत्यादीना पोहोचणारी हानी टाळवी, जेणे करून ग्रंथसंग्रहाचे आयुष्यमान वाढेल. ग्रंथाची हळूहळू होणारी झीज ही जागतिक समस्या आहे. यासाठी उपाय योजना वेळीच नाही केली तर विनाश अटळ आहे . जतन व संवर्धनाचा निश्चित आराखडा तयार करून त्यासाठी लागणारी तंत्रे आणि साधने विकसित करणे, आपत्तीची तयारी करणे यासाठी संवर्धन व्यवस्थापन आवश्यक आहे.

समस्या विधान

स्थानिक, प्रादेशिक आणि राष्ट्रीय पातळीवर संस्कृती आणि समाजावर प्रभाव असणा—या माहिती संसाधनाची अर्थात ज्ञान भांडाराचे जतन करण्याची जबाबदारी ग्रंथालयांची आहे. उच्च दर्जाचे जतन व संवर्धन केल्याचे ग्रंथालये थेट सजीव झाली आहेत. त्यासाठी काही मानके आणि धोरणे प्रमाणित केली आहेत या मानकांची अंमलबजावणी करून ग्रंथालय वास्तू, विविध संसाधने, संसाधन साठवणूकीची स्थिती, संसाधनावर परिणाम करणारे घटक शोधणे व त्यावरील उपाययोजना शोधण्यासाठी संशोधकाने "महाराष्ट्रातील नॅक 'अ, ब आणि क' दर्जा प्राप्त महाविद्यालयीन ग्रंथालयातील संसाधनांचे जतन आणि संवर्धन : तौलनिक अभ्यास" हा विषय संशोधनासाठी घेतला आहे.

व्याप्ती व मर्यादा

महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे ज्यात अभिमत विद्यापीठे, खाजगी विद्यापीठे, आरोग्य विद्यापीठे, कृषी विद्यापीठे, केंद्रीय विद्यापीठे, मूक्त विद्यापीठे आणि तंत्रविज्ञान विद्यापीठे आणि ह्या विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालये ही संशोधनाची व्याप्ती आहे. संशोधनासाठी राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद (नॅक) ने मूल्यांकित केलेले 'अ, ब आणि क' दर्जा प्राप्त महाविद्यालयीन ग्रंथालयातील जतन व संवर्धन यांचा अभ्यास ही या संशोधनाची मर्यादा आहे.

कालावधी

राष्ट्रीय मुल्यांकन आणि अधीस्वीकृती परिषदेने वर्ष २०१३-१४ ते २०१८-१९ या कालावधीत महाराष्ट्रातील १००७ महाविद्यालयांचे मुल्यांकन केलेले आहे. संशोधनासाठी हा पाच वर्षाचा कालावधी घेतला आहे.

लोकसंख्या अभ्यास

महाराष्ट्रात नॅकने मूल्यांकित केले 'अ, ब आणि क' दर्जा प्राप्त महाविद्यालयांची संख्या १००७ आहे. त्यात अ दर्जा प्राप्त ३३५, ब दर्जा प्राप्त ६२० आणि क दर्जा प्राप्त ५२ महाविद्यालये आहेत. या महाविद्यालयीन ग्रंथालयाचा संशोधनात अभ्यास करण्यात येणार आहे.

३ संदर्भ पूनरावलोकन

संशोधनासाठी साहित्याचे पुनरावलोकन करताना भारतात आणि भारताबाहेर झालेल्या अभ्यासा विषयी माहिती उपलब्ध आहे.IFLA, युनिस्को आणि विविध राष्ट्रीय ग्रंथालय , राष्ट्रीय संस्था यांनी जतन व संवर्धनासाठी घेतलेल्या काही प्रकल्पांचा समावेश आहे.

भारतातील अभ्यास

चव्हाण आणि देशमूख (२०१२) यांनी आपल्या लेखात अंकात्मक माध्यम आणि डिजीटायजेशन यांचे मूल्य अधोरेखीत केले आहे

पानेज,बी.एम.(२०१३) यांनी ग्रंथालयातील संवर्धन व संरक्षण कसे केले जाते , पध्दती कोणत्या आहेत याबद्दल चर्चा केली आहे.

सावंत सारिका (२०१४) यांनी मुबईतील शैक्षणिक ग्रंथालयामधील संरक्षण आणि संवर्धन पध्दतीचा अभ्यास केला आहे त्यात त्यांना ग्रंथालयामध्ये संरक्षण आणि संवर्धनाचे निश्चित धोरण नसल्याचे आढळून आले.

ए.मंगलारकरसी आणि आर. सारंगपाणी यांनी कोयंबटूरमधील ग्रंथालयामध्ये संरक्षण आणि संवर्धन पध्दतीचा अभ्यास केला त्यांनाही ग्रंथालयामध्ये संरक्षण आणि संवर्धनाचे निश्चित धोरण नसल्याचे आढळून आले.लेखी धोरणाचा अभाव ,प्रशिक्षित मनुष्यबळ व निधीचा अभाव यामुळे जतन संवर्धन कार्यात अडथळा येतो.

मूजुमदार एस. आपल्या लेखात डिजीटायजेशनचे वेगवेगळे पैलू आणि भविष्यात वापरण्यासाठी ग्रंथालयाच्या साहित्याची माहिती दिली आहे.

अंबिका, वरीष्ठ संशोधक मैसूर यांनी कर्नाटकमधील कायदा महाविद्यालयातील ग्रंथालयाचे जतन व संरक्षणाचा अभ्यास आणि त्यासाठी वापरण्यात येणा—या तंत्रज्ञानाचा अभ्यास केला . त्यामध्ये त्यांना ग्रंथालयीन साहित्याची होणारी झीज,नुकसान यांची कारणे दिसून येतात.

आरोरा (२००९) म्हणतात की डिजीटायजेशन आणि अंकात्मक रक्षण ऐकमेकांशी संबंधीत आहे डिजीटायजेशनचा मुख्य उद्देश ग्रंथालयातील दुर्मिळ साहित्य एकावेळी अनेकांना उपलब्ध करून देणे. जतन करण्याच्या विविध आव्हानांचा अभ्यास केला

कॉग्निनाथ आणि आंगडी (२०१०) यांनी अनेक माध्यमावर साहित्याची निर्मीती केली त्यामुळे दूर्मिळ साहित्याचे जतन आपोआपच झाले.

भारताबाहेरील अभ्यास

रसेल, के. (२०१३) यांनी डिजीटल सामूग्रीचे जतन करण्यासाठी जगभरात राष्ट्रीय ग्रंथालयांनी घेतलेल्या पुढाकाराचा आढावा घेतला आहे. त्यांना असे आढळून आले आहे की ग्रंथालयात पुरेसे कौशल्य असलेल्या कर्मचा–यांचा अभाव होता आणि माहीती तंत्राज्ञानाचा उपयोग करण्यात अडचणी आल्या.

सैली ए. बुकरन यांनी आपल्या लेखात ग्रंथालय साहीत्यावर परिणाम करणारी कारणे यावर लक्ष केंद्रीत केले आहे.

शुल्टस न्यूयॉर्कचे यांनी संसाधने कशी हाताळावीत यावर लक्ष केंद्रीत केले आहेत. पुर्व आशियातील देशांच्या सहकार्यानी एक मानक योजना किंवा धोरण देऊन सांस्कृतीक वारसाच्या समस्याचा सामना करता येऊ शकतो.

४ हेतू आणि आणि उद्दिष्टे

ग्रंथालय वास्तू व तिचे स्थान, ग्रंथालयातील मूद्रित व अमूद्रित माहिती संसाधने, ही संसाधने साठवण्याची योग्य स्थिती तपासणे, संसाधनावर परिणाम करणारे विविध जैविक, रासायनिक, भौतिक आणि यांत्रिक घटक शोधणे जेणेकरून भविष्यात या संसाधनाची जपणूक आणि संवर्धन करणे सोयीचे होईल. हा या संशोधनामागचा मुळ हेतू आहे.

जतन करण्यासाठीची साधने आणि तद्नंतर संवर्धन पध्दतीचे संक्षिप्त रूपात एकत्रिकरण करून सबंधिताच्या नजरेस आणल्यास त्यांच्यामध्ये याबद्दलची जाणीव निर्माण करता येईल. संबंधित घटकांमध्ये ग्रंथपाल, प्राचार्य आणि संस्था यांनी संयूक्तपणे खालील उद्दिष्टांप्रती अत्यंत प्रभावीपणे गंभीरता दर्शवून या उद्दिष्टांची पुर्तता करणे आवश्यक आहे.

उद्दिष्टे

१ ग्रंथालयीन मूद्रित आणि अमूद्रित संसाधनांच्या उपलब्धतेचे परिक्षण करणे.
२ संसाधने साठवणूकीच्या पध्दतीचा शोध घेणे.
३ संसाधनावर परिणाम करणारे घटक शोधणे.
४ जतन व संवर्धनाच्या उपाय योजना कोणत्या व त्या कशा राबविल्या जातात ते तपासणे.
५ जतन व संवर्धनात प्रत्यक्ष कृती कार्यात येणा–या अडथळयांचा शोध घेऊन ते दूर करण्यासाठी प्रयत्न करणे.

६ संसाधनाच्या जतनासाठी ग्रंथालयीन कर्मचा—यांच्या भूमिकेचा शोध घेणे.
७ व्यवस्थापनाकडून जतन व संवर्धनासाठी मिळणारे सहाय्य आणि समर्थनाची पातळी ओळखणे
८ जतन व संवर्धनाची संकल्पना स्पष्ट करून ग्रंथपाल, प्राचार्य आणि संस्था यांच्यात याविषयी जागरूकता निर्माण करणे
९ परिरक्षण व संवर्धन तंत्रज्ञानाची ओळख करून घेणे किंवा जतन व संवर्धनासाठी वापरल्या जाणा—या विविध कार्यक्षम तंत्राचा अभ्यास करणे.
१० निरीक्षणात सापडलेल्या त्रुटींचा अभ्यास करणे, संबंधित ग्रंथालयांना शक्य होतील अशा उकल शिफारशी करणे.
११ वरिल सर्व बाबीची शास्त्रशूध्द मांडणी व चिकित्सा करून अहवाल तयार करणे. हा अहवाल विद्यापीठाकडे व जमल्यास सरकारीदरबारी सुध्दा पाठवणे.

गृहितके

१ काही ग्रंथालयात मूद्रित व अमुदित माहिती संसाधने आहेत तर काही ग्रंथालयात नाहीत.
२ संसाधने साठविण्याची योग्य स्थिती आहे, तर काही ग्रंथालयात नाही.
३ ग्रंथालयीन संसाधनासाठी जतन व संवर्धन धोरण आहे, तर काही ग्रंथालयात नाही.
४ जतन व संवर्धनाची कार्यक्षम तंत्रे व साधने आहेत, तर काही ग्रंथालयात नाहीत.
५ जतन व संवर्धन करण्यासाठी प्रशिक्षित कर्मचारी आहेत, तर काही ग्रंथालयात नाहीत.
६ बहूतांश ग्रंथालयांना जतन व संवर्धनासाठी व्यवस्थापनाकडून निधी उपलब्ध करून दिला जातो, तर काही ग्रंथालयांना नाही.

५ संशोधन पध्दती

ग्रंथालयीन संसाधनांचे जतन व संवर्धन करणे ही ग्रंथपाल व ग्रंथालय कर्मचारी, याबरोबर प्रशासनाची ही असते. संशोधनासाठी विविध पध्दतीचा वापर करून संशोधन करण्यात येणार आहे.

- ग्रंथालयाचे प्रत्यक्ष निरिक्षण करणे, संबंधित साहित्याची समिक्षा करण्यासाठी वर्णनात्मक पध्दती वापरणे
- तथ्य संकलनासाठी खालील तंत्रे व साधने वापरण्यात येतील
- तथ्य संकलनासाठी प्राचार्य, संस्थाचालक यांची मूलाखत घेण्यात येईल कारण प्रत्यक्ष संवादातून अचूक व वास्तविक संकलन होईल व निष्कर्षाप्रत जाता येईल.
- प्रश्नावली हे तथ्य संकलनाचे साधन म्हणून वापरण्यात येईल. ही प्रश्नावली ग्रंथपालासाठी असून त्यात ग्रंथालयीन संसाधनांचे जतन व संवर्धन करण्यासाठी कृती— कार्यक्रम — योजना याबाबत क्रमबध्द प्रश्न तालिका असेल.

६.संशोधनाचे महत्व आणि समाजाभिमूखता

"महाराष्ट्रातील नॅक अ,ब आणि क' दर्जा प्राप्त महाविद्यालयीन ग्रंथालयातील संसाधनांचे जतन व संवर्धनः तौलनीक अभ्यास" या संशोधनाचा उपयोग समाजास खालील प्रकारे होईल

- ग्रंथालयाचे जतन आणि संवर्धन याबाबत जागरूकता निर्माण करण्यास
- ग्रंथालयीन संसाधनाचे जतन संवर्धन पध्दतींचे प्रमाणित चित्र तयार करण्यास
- माहिती संसाधनांना विविध माध्यमावर निर्मिती करून हा सांस्कृतिक ठेवा भविष्यासाठी जतन करण्यास
- माहिती संसाधनावर परिणाम करणारे घटक यांचा अभ्यास करून होणारे संभाव्य नूकसान टाळण्यास मदत.
- जतन व संवर्धनासाठी ग्रंथालयांनी तयार केलेल्या योजना, धोरणे यांचा तूलनात्मक अभ्यास करून प्रमाणित अशी पध्दती निर्माण करण्यास
- प्रत्येक ग्रंथालयासाठी स्वतंत्र 'संवर्धन' विभाग स्थापण्यासाठी
- विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील ग्रंथालयीन कर्मचारी विशेषतः ग्रंथपाल यांना ग्रंथालयाचे जतन व संवर्धन कसे करावे याबाबत प्रशिक्षण देण्यास

७.प्रस्तावित कार्याचे नियोजन :

अ.क्र.	घटक	महिने
१	संदर्भ शोध/निरीक्षण	३
२	तथ्य संकलन	१२
३	तथ्य सादरीकरण	६
४	तथ्य विश्लेषण व निष्कर्षाची मांडणी	६
५	Screening	३
६	टंकलेखन	३
७	अहवाल लेखन	३
	एकूण महिने	३६

प्रकरणाची संरचना

अ.क्र.	प्रकरणाचे नाव
१	प्रस्तावना
२	जतन व संवर्धन
३	संसाधनावर परिणाम करणारे घटक
४	प्रतिबंधात्मक उपाय व देखभाल
५	उपसंहार
६	संदर्भ ग्रंथसूची

८ संदर्भ ग्रंथसूची

1. Banks, Paul N., And Roberta Pilette, Eds. Preservation: Issues And Planning. Chicago : American Library Association, 2000. Pp.360
2. Chandeganipour, Mostapha Ojaghi,Rezwan;Rafiei Hossein Afshar; Mina :Bio-Deterioration Of Library Materials: Study Of Fungi Threatening Printed Materials Of Libraries In Isfahan University Of Medical Sciences In 2011 Journal Of Microbiology Mar/Apr 2013,Vol 6 Issue 2.P1-27
3. Carolyn Harris, "Selection For Preservation, " In Preservation, 206-224
4. Cloonan M, Conservation And Preservation Of Library And Archival Materials,Encyclopedia Of Library And Information Sciences, Third Edition (2009) Pp. 1250-1268 Published By CRC Press
5. Erhardt, D. & Mecklenburg, M. 1994. "Relative Humidity Re-Examined. Preventive Conservation: Practice, Theory And Research ." Prevantive Conservation: Practice, Theory And Research. Preprints Of The Contributions To The Ottawa Congress, 12-16 September 1994., 32-38.
6. Harvey, Preservation In Libraries, Chap. 7.
7. Harris K, Schur S, A Brief History Of Preservation And Conservation At The Library Of Congress,Preservation Directorate, Library Of Congress (2006) P. 30
8. Iyishu V, Nkanu W, & F, Ogar O, preservation and conservation of library materials in the digital agE,Journal Of Infromation And Knowledge Management, Vol. 4, Issue 2 (2013) P. 10
9. Jyotsana Sahoo , CHRJ, VOL. XLVIT, No. 1 Preservation Of Library Materials :Some Preventive Methods.
10. Kademani B S , Kalyane V.L. Vijaykumar (2003) Preservation Of Information Resources In Libraries : New Challenges ,Bosla One Day Seminar : Resource Management 2003
11. Kanyengo C, Preservation And Conservation Of Information Resources In The University Of Zambia Library.Journal Of Archival Organization, Vol. 7, Issue 3 (2009) Pp. 116-128
12. Manernova O, Conservation Of Library Collections,IFLA Journal, Vol. 41, Issue 1 (2015) Pp. 63-69
13. Margaret Child And Laura J. Word, "Programs, Priorities And Funding, In Preservation, 6381.
14. Ogunmodede T, Ebijuwa A, Problems Of Conservation And Preservation Of Library Resources In African Academic Libraries: A Review Of Literature,Greener Journal Of Social Sciences, Vol. 3, Issue 1 (2013) Pp. 050-057
15. Prasad , Lalan Kumar.(1995).Protection Of Documents From Photochemical Effects Of Light – CCPI, VOL 28 New Delhi P49-55
16. Paul N. Banks, "Environment And Building Design" In Preservation, 114-144.
17. Ross Harvey, Preservation In Libraries: Principals, Strategies, And Practices For Librarians, Topics In Library And Information Studies (London: Bowker Sauer, 1993 , Chap.1. On Reserve In Carlson Library.
18. Russell, K. Digital Preservation Ensuring Access To Digital Materials Into The Future. 1999 Available At: Http//Www.Leed.Ac.Uk/Cedars/Chapter.Htm (Accessed On 20 November 2013).

19. Sawant S S, Strategies For Preservation Of Digital Documents: An Overview, Trends In Information Management 2 (1) (2006) 23-34
20. Sally A. Bucchanan, “Preservation Management: Emergency Preparedness, “ In Preservation, 159-165.
21. Schultz, Artur W., Ed. Caring For Your Collections. New York: Harry N. Abrams, Inc. 1992.
22. Sophia K. Jordan, “A Review Of The Preservation Literature, 1993-1998: The Coming Of Age,” Library Resources & Technical Services 44, No. 1 (January 2000) : 4-21. On Electronic Reserve.
23. Uniyal C .P.(1995) Preventive Conservation Of Archieval Materials : Some Rather Ignored Vohra , Sharma ,Preservation And Conservation Of Manuscripts: A Case Study Of A. C. Joshi Library, Panjab University, Chandigarh, Library Herald, Vol. 49, Issue 2 (2011) Pp. 158-170 Published By Delhi Library Association
24. Zerek B., Microbiological Control Of Library Collections – A Tool For Preservation And Disaster Response, 88. Preservation And Conservation, Preservation And Conservation Core Activity (2010) Pp. 1-13.CCPL , VOL 28 New Delhi P55-55
25. www.naac.gov.in/19-quick-links/32-accreditation-status

संशोधक

Minakshi

मिनाक्षी बाबूराव बोंडगे

ग्रंथपाल
महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा
ता. निलंगा जि. लातूर

मार्गदर्शक

Dr.G.N.Panchal
Librarian & Research Guide
Madhavrao Patil College, Palam,
Tq. Palam Dist. Parbhani

डॉ. ग. ना. पंचाळ
ग्रंथपाल
माधवराव पाटील महाविद्यालय, पालम
ता. पालम जि. परभणी